


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# आदिवासी लोकगीतातील स्त्री दर्शन

**डॉ .मंदा माणिकराव नांदुरकर**
मराठी विभाग प्रमुख,
मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती.

**सारांश:**

आदिवासी लोकसाहित्यात लोकगीतांचे दालन समृद्ध आणि सशक्त असून ते विविध वैशिष्ट्यांनी नटलेले आढळते. आदिवासींची स्वतंत्र संस्कृती आढळते. आदिवासी लोकगीतातील स्त्री जीवन अतिशय मौलिक आहे.

आदिवासी व निसर्ग यांचा अतूट संबंध आहे.सामूहिक जीवनाला ऊर्जा प्रदान करणारा प्रकार म्हणजे लोकगीत होय. आदिवासी लोकगीतातून स्त्री जीवनाचे विविध पैलू प्रकाशात येतात, ती एक सांस्कृतिक साखळीच असते त्यातून कौटुंबिकता ,मानसिकता, विवंचना, आर्थिकता, नैतिकता, नातेसंबंध आणि रितीरिवाज यांचे अनोखे दर्शन घडते. रुढी, परंपरा सांभाळत वाट्याला येणारे दुःखही लोकगीतातून व्यक्त होताना दिसून येते. स्त्रियांचे कठोर पण, कलात्मकता, सर्जनशीलता गीतातून प्रकट होताना दिसते. आदिवासी स्त्री ही फार अंधश्रद्धाळू आणि देवभोळी आहे. जुन्या मूल्यांमध्ये अडकलेली गीतातून दिसून येते नव्या युगाचे संदर्भही स्वीकारण्याची तिची मानसिकता आपल्याला ठिकठिकाणी जाणवते. आदिवासी स्त्री ही सन्मान दर्शक आहे, याचे प्रत्यंतर अनेक गीतातून येते. पेरणीच्या वेळी व शुभ कार्यात तिचे स्थान मोलाचे आढळते. आदिवासी स्त्रियांना आपल्या संस्कृतीचा अभिमान असल्याचे लक्षात घेता येते ,कोणत्याही साहित्याचा स्पर्श नसलेल्या आदिवासी लोकगीतांमध्ये स्त्री मनाचा मुक्त अविष्कार आढळतो, त्या गीतांचे भाव सौंदर्य मनाला भुरळ घालते. आदिवासी लोकगीतातून स्त्री मनाचे विविध कंगोरे लक्षात घेता येतात. आदिवासी लोकगीते जतन व संवर्धन करणे महत्त्वपूर्ण ठरते.

**बीज शब्द.. आदिवासी ,लोकगीत, स्त्री दर्शन.**

**प्रस्तावना**

आदिवासी संस्कृती ही पुरातन अभिजात आणि समृद्ध संस्कृती आहे. आदिवासी स्त्री लोकगीते आपल्या आगळ्यावेगळ्या अशा वैशिष्ट्यांनी आपले वेगळेपण दाखवते आदिवासी

लोकगीते विविधतेने नटलेले असून त्या त्या परिसरातील अनुभव, जीवन विषयक संदर्भात त्या गीतांमध्ये प्रकट होतात. आदिवासी स्त्रियांनी ही लोकगीते जतन करून ठेवण्याचे मोलाचे कार्य केलेले आहे त्यांच्या बोलीतून ही गीते आलेली आहेत दैनंदिन जीवनाशी निगडित असणारे शब्द लोकगीतांमध्ये दिसून येतात त्यामुळे त्या गीतांना माऊलीचा प्राप्त झालेली दिसून येते. बोलीचा गोडवा, लय ,ताल, हेल सर्व लोकगीतातून आपल्याला लक्षात घेता येते. आदिवासी लोकगीतातून स्त्रियांच्या विचारशक्तीची, सामाजिकतेची भावना तसेच त्यांच्या उत्साहाची कल्पना येते. भावभावना ,संवेदना निसर्गाशी तन्मयता समूह जीवनाची ओढ ,जन्म, मृत्यू ,विवाह सण ,समारंभ, रूढी, परंपरा, आनंदाचे व विराहाचे क्षण आदिवासी संस्कृतीचे व निरागस मनाचे दर्शन लोकगीतातून होताना दिसून येते. आदिवासी लोकगीते रसिकांना भुरळ पडतात व प्रत्येकाच्या मनाचा ठाव घेतात. आदिवासी लोकगीते ही वांङ्ःमयीन सामाजिक सांस्कृतिक भाषिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण आहेत जीवनातील अनेक भावछटा स्त्री जीवनाचे अनेक पैलू या गीतांमधून दिसून येते त्यामुळे या लोकगीतांचा समाजाच्या दृष्टीने अभ्यास होणे अधिक महत्त्वपूर्ण ठरते आदिवासी लोकगीते ही त्यांच्या जीवनाची गाथाच आढळते त्यांच्या मनाचे सुखदुःख, भावबिंब या लोकगीतांमधून उमटलेले दिसून येते. आदिवासी लोकगीतांमध्ये स्त्रियांचे सुखदुःख, स्त्री मनातील भावभावना, स्त्री जीवन जगण्याची पद्धती, स्त्री मनाचे कल्पनाविश्व, भावविश्व ,नातेसंबंध प्रकट होताना दिसून येते. आदिवासी लोकगीतात पाहुण्यांच्या स्वागताची त्यांचा लोकाचार अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत व त्यांच आतिथ्य मनापासून करताना दिसून येतात. आदिवासी स्त्री आपल्या लोकगीतातून तो भाव व्यक्त करताना म्हणते,

चावल व परसी
चावल व परसी
मन चावल व परसी
गुड डाली वो.
गुड डाली
गुड डाली
मन मुठ्ठी से
आई मेजवान
खैरमाल छे
आई मेजवान

खैरमाल छे

घरी आलेल्या पाहुण्यांना वाढण्यासाठी भात केलेला आहे, गरमागरम भात व त्यावर मुठ्ठीने गुळ टाकून पाहुण्यांना खाण्याचा आग्रह करण्यात येत आहे कारण हे पाहुणे खूप लांबून आलेले आहे, त्यांच्या आतिथ्याची कल्पना एकूणच या लोकगीतातून दिसून येते. आदिवासी स्त्रियांना आपल्या नात्याबद्दल असणारी ओढ, आलेल्या पाहुण्यांबद्दल असणारी आपुलकी व त्यांच्यासाठी केलेल्या खाद्यपदार्थाची नोंद सुद्धा या लोकगीतातून घेता येते. खैरमाल हे गावाचे नाव आहे. या गावात असलेले नातेसंबंध लक्षात येते. विवाहाच्या विविध प्रथा आदिवासी जमातीमध्ये दिसून येते. या प्रथा, परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होताना लक्षात घेता येते. आदिवासी जमातीमध्ये कोणताही सण ,समारंभ, पूजाविधी साजरा करताना पूर्वजांची आठवण स्वाभाविकच आहे. आणि प्रत्येक वेळी पूर्वजांची आठवण ,नामस्मरण करून कार्याला सुरुवात करताना दिसून येतात. आपल्या पूर्वजांना ते निमंत्रण देतात.

सरग भवन्ति हो
सरग भवन्ति
गिर्धरनी एक संदेशा
लई जावो
सरग का अमुक
दाखी व कयजो
तुम घर अमोको
ब्याव जयम सर
सारजू हो हमारा
तो आवणा ने हाये
जडी दिया
वज किवाड
अग्गळ जडी लुहा की जी..

स्वर्गात उडणाऱ्या घारीजवळ एक संदेश दिल्या जातो की आमच्या पूर्वजांना सांग की ,तुमच्या घरात मुलीचे लग्न होत आहे तुम्हाला बोलावले आहे यावर पूर्वज घारीजवळ संदेश पाठवतात की तू त्यांना जाऊन सांग की, तुमच्याकडून जसे शक्य होईल तसे हे कार्य सांभाळून

घ्या. आमचे तर कोणाचे येणे होणार नाही कारण आम्हाला आमच्या येण्याच्या वाटा विशालकाय दरवाजांनी बंद आहे .मोठ्या कडांनी दरवाजे बंद केले आहे.

आपले पूर्वज, त्यांची आठवण, त्यांना निमंत्रण देणे या सर्व भावभावना प्रस्तुत गीतातून प्रकट होताना दिसून येते पूर्वजांपर्यंत निरोप पोहोचल्यानंतर त्यांचाही परत संदेश येतो की तुम्हाला जसे शक्य असेल तसे आटोपून घ्या.
प्रस्तुत लोकगीत ऐकताना मनाचा ठाव घेते.

कष्टकरी स्त्रिया दळण दळताना जात्यावरच्या ओव्या गाताना दिसतात कित्येकदा त्या उत्स्फूर्त करतात त्यांची लय मनाला स्पर्शून जाते त्यामुळे दळण सुरू असताना थोडं श्रम हलके होण्यासाठी त्या गीत गाताना दिसून येतात.

दळण दळताना
राहिले चार गहू
दळण दळताना
राहिले चार गहू
किसना सारखे
माझे भाऊ

दळण दळताना राहिले चार दाणे किसना सारखे माझे मामे काही आदिवासी बोलीचे मराठी भाषा आणि मराठी संस्कृती यांच्याशी जुळलेले नाते व्यक्त होताना दिसून येते, पौराणिक संदर्भ काही गीतातून उलगडल्या जातात. कित्येक दिवस प्रतीक्षा करून पाऊस आला नाही की पावसाला निमंत्रण दिल्या जाते त्याकरता गावातील बायका मुली मातीची घागर घेऊन त्यामध्ये बेडूक सोडून पाण्याने काठोकाठ भरून पावसाचा आवाज करीत गाणी गातात,

ओरड ग ओरड बेंडकुळी सतवाची नारी ग
पाणी कोठे पाहू
बरंस रे मेघा
काठीच्या तासी

राई सरवाईची
येचिता येचिता धरला
कान्याने हात
सोड सोड रे कानिया
मी तुही भासी
अशी कशी भासी
देवाघरची काशी
देवा घरी तू जाशील
पाणी घेऊन येशील
पाणी पडे दना दना
पाटलीन नेसते गोधड
पाणी पडे दना दना
पाटील गेला सिवारा
आला पाण्याचा फवारा
वरड वरड रे मेघिया
पळाटीच्या तासी
राई सरवायची
राई सरवायची

सर्वांनी शिक्षण घ्यायला हवे म्हणून ते आपल्या लोकगीतातून संदेशही देतात आदिवासी स्त्रिया सांगतात की अशिक्षित राहून कोणाचेही चांगले होणार नाही. शिक्षण घेणे हे महत्त्वाचे आहे. ते सर्वांनी घ्यायलाच पाहिजे. स्वतः आशिष अशिक्षित राहणाऱ्या स्त्रिया शिक्षा हे सर्वांनी घ्यायला हवे असे लोकगीतातून खुणावतात लोकगीताचा हा ठेवा एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत जातो, आणि आपल्या लोकगीतातून आदिवासी स्त्री व्यक्त होते.

लिखाई पढाई इठूये डो
जिंदगी के सारी रेंजा
इस्कूलेन सेने जा डाइ
अडाणी बाकी थाड जाड

लिखाई पढाई इठूये डो
जिंदगी के सारी रेंजा

शिक्षणाचे महत्त्व आपल्या गीतातून या स्त्रिया सांगतात. शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात. भारतात आदिवासींचे विशाल विश्व आहे. नागर ,ग्रामीण आणि दलित जीवनापासून दूर डोंगरदऱ्यात दुर्गम भागात ते जीवन जगताना दिसतात. आदिवासी म्हणजे मूळ रहिवासी. आदिवासी लोकांना एकत्रित ठेवणारी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची बोली त्यांना एकत्रित ठेवणारा हा एक महत्त्वाचा ध्रुव आहे या बोलीतून त्यांची सांस्कृतिकता जोपासल्या जाते. त्यांच्या संस्कृतीमध्ये असलेल्या कलेला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते धार्मिक नृत्य प्रसंगोपात चालणारी नृत्य विशेष विधींसाठी लग्नप्रसंगी शेतीशी विविध सण संबंधित गीते या सर्वांचा त्यात समावेश होतो आदिवासींमध्ये होळीचा सण विशेषत्वाने साजरा केला जातो अशावेळी त्यांचे पारंपारिक गीते व नृत्य यांना उधाण येते.

आदिवासी लोकगीतांची जोपासना स्त्रियांनीच केलेली असल्यामुळे स्त्री जीवनाचे व त्यातील भावभावनांचे विविध रंगछटा असलेले चित्र आपल्याला आदिवासी स्त्री लोकसाहित्यातून पाहावयास मिळतात आदिवासी स्त्री गीतातून साकार होणारे स्त्री जीवन प्रामुख्याने डोंगरदऱ्यात राहणाऱ्या स्त्रियाच व्यक्त करू शकतात ,कारण त्या स्त्रियांनी ती परिस्थिती अनुभवलेली असते. आदिवासी स्त्री गीतातून आविष्कृत होणाऱ्या स्त्री जीवनात व्यक्ती जीवनाबरोबरच कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे संदर्भ पहावयास मिळतात.

आई म्हणजे अथांग प्रेम. मुलीची विदाई करत असताना आईने दिलेला पानाचा वेढा जिव्हाळ्याचा गोडवा निर्माण करतो आईच्या प्रेमाचा गोडवा तिच्या प्रेमाची मधुरता प्रस्तुत गीतातून व्यक्त होताना दिसून येते.

जिमो जिमो बेटी
पान बिडा जिमो
आओ बेटी
पानबिडा जिमो
आवो माय कडूवा ना लगे
सासर ससुरा पानबिडा मीठा ना लागे

मुलगी सासरी जाताना तिला आई पानाचा विडा देते. मुलगी आपल्या आईला म्हणते की तू दिलेल्या पानाच्या विड्याची मजा वेगळीच आहे तो भाव या गीतातून व्यक्त झालेला दिसून येतो. स्त्री जीवनाची सामाजिकता व समूह मनाच्या वैविध्यपूर्ण मनोवृत्ती याचा मेळ लोकगीतातून आपल्याला लक्षात घेता येतो.

लोक जीवनातील स्त्रीची भाववृत्ती आणि सामाजिक रूढी ,जन्म, संस्कार यातून निर्माण झालेले स्त्रीचे मनोवृत्ती या सर्वांचा आविष्कार आदिवासी स्त्रियांच्या लोकगीतातून आपल्याला बघायला मिळते. स्त्री जीवनात दोन टप्पे महत्त्वपूर्ण आढळतात सासर व माहेर या दोन्ही टप्प्यावरच्या भूमिका तिला पार पाडाव्या लागतात अनेक नात्यांच्या गुंफणातून तिला पुढे जावे लागते त्यामुळे त्यांच्या गीतातून वास्तव जीवन अभिव्यक्त होते रीतीभाती, नातीगोती ,आचार विचार, राहणीमान , पेहराव , स्थलांतर दुष्काळ, नितीनियम, सुखदुःखाचे प्रसंग ,परंपरा हे सर्व लोकगीतातून व्यक्त होताना दिसते. लोक गीतांचा गोडवा, बोली या सर्वांचे पडसाद गीतातून प्रकट होतात.

अरे गली गली
बिजली लगायो
सरकारने
अरे गली गली
बिजली लगायो
सरकारने
नया नया कायदा
निकालो सरकारने
नया नया कायदा
निकालो सरकारने
गॅस भूल गया
कंदील भी भूल गया
अरे गली गलीबिजली
लगायो सरकारने
अरे गली गली बिजली
लगायो सरकारने

प्रस्तुत लोकगीतातून आधुनिकता लक्षात येते प्रत्येक ठिकाणी बी झालेली आहे शासनाने नवीन नवीन कायदे काढलेले आहेत गॅस कंदील दिसत नाही तर सर्वत्र विजेवर चालणारे यंत्र दिसत आहेत. आधुनिक नागरी शब्द लोकगीतातून प्रकट होताना दिसते. कायद्याविषयीचे ज्ञान, जीवनातील प्रगती या गीतातून स्पष्ट होते. आदिवासी लोकगीतांची रचना ही स्त्रियांनीच केलेली असल्यामुळे त्यांच्या भावभावना लक्षात घेता येतात. त्यांनी अनुभवलेली परिस्थिती गीतातून मांडण्याचा उद्देश लक्षात घेता येतो. आदिवासी स्त्री गीते संस्कृतीचे अविभाज्य अंग आढळते. त्यातून त्यांच्या जीवनाचे भावविष्कार प्रकट होते, त्यामुळे ही लोकगीते कितीही ऐकली तरीही ती ताजी टवटवीत वाटतात व त्या बोलीचा गोडवा मनाचा ठाव घेते.

**निष्कर्ष**

आदिवासी लोकगीतांचा व स्त्रियांचा जवळचा संबंध आढळतो. आदिवासी लोकगीतांची निर्मिती स्त्रियांनीच केलेली आहे हे लक्षात घेता येते. निसर्ग हा आदिवासी लोकगीतांचा मुख्य विषय आढळतो. आदिवासी लोकगीतातून स्त्रियांमध्ये असलेली आव्हान क्षमता आढळते. नव्या पिढीला दिशा देणारी लोकगीते आढळतात. आदिवासी लोकगीतांमध्ये ठेका ,लय ,ताल ,स्वर आढळतो. आदिवासी लोकगीतांमधून स्त्रियांच्या जीवन जाणिवा व्यक्त होतात. आदिवासी लोकगीतातील बोलींमध्ये वैविध्य व गोडवा आढळतो. एकूणच आदिवासी लोकगीतांमध्ये स्त्रियांचे विविध पैलू आढळतात व ते अभ्यासनीय आहेत, त्यामुळे या लोकगीतांचा ठेवा जतन व संवर्धन करणे महत्त्वपूर्ण ठरते.